प्रेस नोट लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे.
दिनांक २१.०७.२०२५

**<u>लोकसेवक पोलीस हवालदार १८४२ राजाराम रुंझा डगळे, घोटी पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५,०००/-रु पहिला हप्ता स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम स्वता: स्विकारुन पळुन गेल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल.</u>**

तक्रारदार हे येल्याची मेट, वावी हर्ष, ता. त्रंबकेश्वर येथे रहावयास असून ते शेती व्यवसाय करुन त्यातून मिळणा-या उत्पन्नावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. तक्रारदार यांची मुलगी आजारी पडल्याने तिच्या औषधोपचाराकरीता त्यांचेकडे पैसे नसल्याने त्यांनी त्यांची मोटारसायकल श्री. योगेश पुनाजी वाघ यांच्याकडे गहाण ठेवून त्यांच्याकडून १२,०००/-रु उसने घेतले होते. तक्रारदार यांनी श्री. योगेश वाघ यांना त्यांच्याकडून मो. सायकल गहाण ठेवून घेतलेले १२,०००/- व व्याजाचे ३,०००/-रु असे एकुण १५,०००/-रुपये त्यांना परत करुनही त्यांनी तक्रारदार यांना त्यांची मो. सायकल परत केली नाही. म्हणुन तक्रारदार योगेश वाघ यांचेकडे त्यांची मो. सायकल परत देणेकरीता तगादा लावला असता त्यांनी तक्रारदाचे घरी येवून तक्रारदार व त्यांचे पत्नीला शिवीगाळ करुन मारहाण केली. म्हणुन तक्रारदार यांची पत्नी हिने योगेश वाघ यांचे विरुध्द घोटी पो.स्टे. येथे एन.सी. नोंद केली होती. तेव्हा घोटी पो. स्टेशनचे पो. हवा. राजाराम डगळे यांनी तक्रारदार यांची मो. सायकल त्यांना वाघ यांचेकडून परत मिळवून देवून त्या मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक येथे आज दि. २१.०७.२०२५ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची आज रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पो. हवा. राजाराम डगळे यांनी तक्रारदारांची गहाण ठेवलेली मो.सायकल परत मिळवून दिल्याच्या मोबदल्यात तडजोडी अंती ५,०००/-रुपये लाचेची रक्कमेच्या पहिल्या हप्त्याची मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान सदर लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन पळून गेल्याने त्यांच्याविरुध्द घोटी पो. स्टे. येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

**सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक विभागाचे पोलीस निरीक्षक रुपाली खांडवी, तसेच पथकातील पो.हवा. ८९१/ पंकज पळशिकर व पो.हवा. ४८४/ प्रमोद चव्हाणके या पथकाने केली आहे.**

**सदर कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मा. भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक मा. श्री. माधव रेड्डी व वाचक पोलीस निरीक्षक श्री. स्वप्निल राजपुत यांचे मार्गदर्शन लाभले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.**